
म.टा.पू.पान क्र.1 दि.21/04/2023

# मिरा-भाईंदरवर 'नजर'

## सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाचे काम पूर्ण; उद्यापासून होणार कार्यान्वित

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**



**पोलिसांना मदत**

मिरा-भाईंदर महापालिकेकडून बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याची अनेक गुन्ह्यांचा तपास करण्यात पोलिसांना मदत झाली आहे. आतापर्यंत पोलिसांना एखाद्या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी विविध पोलिस ठाण्यात जाऊन सीसीटीव्हीची पडताळणी करावी लागत होती. मात्र आता पालिकेने नियंत्रण कक्ष तयार केल्यामुळे, एकाच ठिकाणावरून संपूर्ण शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची पडताळणी करता येणार आहे. त्याद्वारे प्रत्यक्षात सुरू असणाऱ्या हालचालींवर नजर ठेवता येणार आहेत.

मिरा-भाईंदर शहराच्या सुरक्षिततेला बळकटी देण्यासाठी महापालिकेकडून शहरात शेकडो सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. हे सीसीटीव्ही आतापर्यंत विविध स्थानिक पोलिस ठाण्यांशी जोडलेले होते. मात्र या सर्व सीसीटीव्हींवर एकाच ठिकाणावरून नियंत्रण ठेवता यावे, यासाठी 'नियंत्रण कक्ष' उभारण्याचे काम हाती घेण्यात आले होते. हे काम नुकतेच पूर्ण झाले असून उद्या, शनिवारी त्याचे लोकार्पण करण्यात येणार आहे. त्यामुळे आता मिरा-भाईंदरकरांवर यंत्रणांना एकाच ठिकाणावरून नजर ठेवता येणार आहे.

मिरा-भाईंदरमधील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पालिकेने संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार या कामाचा १७४ कोटींचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करत, तो सरकारला मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. त्याला राज्य सरकारच्या गृह विभागाने मंजुरी दिली आहे. परंतु पुढील टप्प्यात निविदा काढण्यास परवानगी देण्यात न आल्याने या कामासाठी शासन निधी मंजूर झालेला नाही.

मागील काही वर्षांत सीसीटीव्हीचे वाढलेले महत्त्व लक्षात घेता, पालिकेने स्वतःच्याच निधीतून हे काम हाती घेतले होते. नगरसेवक निधी, प्रभाग समिती निधी व सामान्य पालिका निधी अशा कोट्यवधींच्या निधीतून साडेआठशेहून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे रस्ते, बाजारपेठा, चौक, उद्याने व इतर वर्दळीच्या ठिकाणी बसवण्यात आले आहेत. हे कॅमेरे लगतच्या पोलिस ठाण्यांशी जोडण्यात आले आहेत. मात्र संपूर्ण शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर एकाच ठिकाणावरून नजर ठेवता येत नसल्याने, शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी, म्हणजेच भाईंदर पूर्व-पश्चिम पुलाखाली नियंत्रण कक्ष उभारण्याचा निर्णय पालिकेने घेतला होता.

त्यासाठी सुमारे साडेसहा कोटी रुपये खर्च करून अत्याधुनिक नियंत्रण कक्ष तयार करण्यात आला आहे. पालिकेकडून बसवण्यात आलेले निम्मे सीसीटीव्ही कॅमेरे या नियंत्रण कक्षाशी जोडण्यात आले आहेत. उर्वरित कॅमेरे जोडण्याचे काम सध्या सुरू आहे. या नियंत्रण कक्षाचे उद्घाटन शनिवारी पार पडल्यानंतर, तो कक्ष कार्यान्वित होणार आहे. येथून संपूर्ण शहरावर नजर ठेवता येणार आहे. हा कक्ष पालिकेने तयार केला असला, तरी तो मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिसांच्या ताब्यात देण्यात येणार आहे.

# पाणथळीवरील मातीभराव रोखण्यासाठी विशेष पथक

**म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर**

**मिरा-भाईंदर पालिकेचे पाऊल**

मिरा-भाईंदरमध्ये पाणथळ जमिनींवर, रस्त्याकडेला व इतर परिसरात बेकायदा भराव टाकल्याचे अनेकदा निदर्शनास येत आहे. यासंबंधीच्या अनेक तक्रारी पालिकेकडे प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर आता बेकायदा भराव रोखण्यासाठी विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीत बऱ्याच भागात खारफुटी आहे. या क्षेत्रात माती भरावास मनाई असली, तरी मोठ्या प्रमाणात खारफुटीत राडारोडा टाकला जातो. डेब्रिजच्या विल्हेवाटीचे नियम धुडकावून शहरातील रस्त्याकडेला, पाणथळ जमिनीत व झाडाझुडपांत डेब्रिज टाकले जातात. या प्रकरणी महसूल विभागाकडे तक्रार केल्यानंतर, अनेकांवर कारवाई करण्यात आली आहे. पालिका प्रशासनाकडूनही यासंदर्भात अनेक तक्रारी करण्यात येत होत्या. मात्र यावर त्यांच्याकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याने नाराजी व्यक्त केली जात होती.

या पार्श्वभूमीवर बेकायदा माती भराव रोखण्यासाठी स्वच्छता निरीक्षक व मुकादम यांचे एक पथक पालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी तयार केले आहे. हे पथक १२ तास याप्रमाणे दोन टप्प्यांत तैनात असणार आहे. परिसरात बेकायदा माती भराव केल्यास संबंधितावर कारवाई करणे, डेब्रिजने भरलेल्या वाहनांची परवानगी तपासणे, गस्त घालणे इत्यादी जबाबदारी या पथकातील अधिकाऱ्यांवर देण्यात आली आहे.

पुढारी पू.पान क्र.1

# ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड येथील नियमांचे उल्लंघन करून चालणाऱ्या सोना पॅलेस (भार्गव पॅलेस) ऑर्केस्ट्रा बारवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांनी कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये मिरारोड पोलीस ठाण्यात ग्राहक, मॅनेजर, कॅशिअर, बारचे कर्मचारी व.मालक अशा ९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या ऑर्केस्ट्रा बारमध्ये महिला सिंगरच्या नावाखाली परवाना नसतांना हिंदी गाण्याच्या तालावर मुलींकडुन नृत्य करवुन घेतले जात असुन त्या बारचे चालक/मालक, मॅनेजर, कॅशिअर, स्टीवर्ड, वेटर, वादक / पुरुष सिंगर हे मुलींना नृत्य करण्यास प्रोत्साहन करीत आहेत अशी माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर यांना मिळाली होती. त्यानुसार पोनि समीर अहिरराव यांनी पथकासह त्या ठिकाणी छापा टाकला त्यावेळी मध्यरात्रीचे १२ वाजून ५० मिनिटे झाली होती. आतमध्ये प्रवेश केला असता बारमधील स्टेजवर ७ मुली होत्या. त्यातील काही मुली डान्स करत असल्याचे दिसून आले. तसेच काही ग्राहक पुरुष बसलेले दिसून आले. या ऑर्केस्ट्रा बार आस्थापनेचे चालक, मॅनेजर व कॅशियर, ग्राहक ताब्यात घेण्यात आले.

CS CamScanner

दि. 21/04/2023

पुढारी पू. पान क्र.3

सकाळ पू. पान क्र. 2

# राष्ट्रीय सुरक्षा विषयावर वसईत काँग्रेसचे आंदोलन

## जबाब दो मोदी, जबाब दो च्या दिल्या घोषणा





**वसई : पुढारी वृत्तसेवा**

देशाची राष्ट्रीय सुरक्षा आणि भ्रष्टाचार या मुद्द्यांवर केंद्रातील भाजप प्रणित मोदी सरकारवर राळ उठवत महाविकास आघाडी म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस तथा पालघर लोकसभा निरीक्षक विजय पाटील आणि वसई विरार शहर जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे जिल्हाध्यक्ष ओनिल आल्मेडा यांच्या नेतृत्वाखाली वसई तहसीलदार कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ जवाब दो मोदी, जबाब दो, असे फलक झळकावत जोरदार आंदोलन करण्यात आले.

यावेळी बोलताना ओनिल आल्मेडा म्हणाले, भाजपाचे जेष्ठ नेते आणि जम्मू काश्मीरचे राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी केंद्रातील भाजपाई सरकारचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर गंभीर आरोप वजा खुलासा केला आहे, ही बाब अतिशय गंभीर आहे. पुलवामा हल्ल्यात देशाचे ४० जवान शहीद झाले. या हल्ल्याबाबत पुर्व कल्पना होती. जवानांना विमानाने नेण्यासाठी विनंती वजा पत्र आर्मीने दिले होते, तरीही देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले. ही बाब देशाचे जवान आणि देशातील जनतेसाठी सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत चिंताजनक आहे.

माहित असूनही जवान शहीद होऊ देणे, त्याबाबत ३०० कोटी रु. गप्प घेऊन राहण्यास सांगणे, आजतागायत आपल्या देशातील जवानाना शाहिद करण्यासाठी आलेले ३०० किलो आरडीएक्स याबाबत चौकशी न करणे, यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघटन महासचिव राम माधव यांच्या भूमिकेबाबत चौकशी न होणे या बाबी गंभीर असल्याचे आल्मेडा यांनी सांगितले. तहसीलदार अविनाश कोष्टी यांना निवेदन देण्यात आले.



**नालासोपारा :** मिरा-भाईंदर, वसई-विरारचे पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांनी वसईत क्रिकेटचा आनंद लुटला.

# पोलिस आयुक्तांनी लुटला क्रिकेटचा आनंद

नालासोपारा, ता. २० (बातमीदार) : मिरा-भाईंदर, वसई-विरारचे पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांनी रविवारी (ता. १६) वसईत क्रिकेटचा आनंद लुटला आहे. संपूर्ण एक ओव्हर खेळत आपल्या बॅटमधून त्यांनी फटाक्यांची आतषबाजी केली. पोलिस आयुक्तांच्या खेळण्याने पत्रकार, पोलिस, वकील आणि क्रिकेटर या सर्वांमध्येच आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

वसईच्या उमेळमान मैदानावर शुक्रवारपासून (ता. १४) नरवीर चिमाजी अप्पा चॅम्पियन ट्रॉफी-२०२३ चे आयोजन करण्यात आले आहे. पालघर जिल्ह्यातील सर्वांत मोठी मानाची क्रिकेट स्पर्धा वसईत भरवली आहे. या स्पर्धेसाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. देशात खेळणाऱ्या अनेक दिग्गज खेळाडूंनीही या स्पर्धेत उपस्थिती नोंदवून क्रिकेटपटूंना प्रोत्साहन दिले. रविवारी (ता. १६) मिरा-भाईंदर, वसई-विरारचे पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांनीही सकाळी साडेदहा वाजता मैदानावर हजर राहून क्रिकेटपटूंना प्रोत्साहन देत स्वतःही क्रिकेटचा आनंद लुटला.

CamScanner

पुढारी पान क्र.5

दि.21/04/2023

# मिरा-भाईंदरमध्ये अवैध व्यवसाय

## रात्रभर चालणाऱ्या गैरकृत्यांकडे पोलिसांचे दुर्लक्ष

**मिरारोड : नामदेव काशिद**

मिरा-भाईंदर व वसई -विरार पोलीस आयुक्तालय हद्दीतील मिरा-भाईंदर शहरात गेल्या काही दिवसांपासून नवनवीन अनधिकृत लॉटरी सेंटर, गुटखा व इतर अमलीपदार्थ, जुगार व पहाटेपर्यंत डान्स बार बिनधास्तपणे सुरू असल्याचे दिसत आहेत. याकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष असल्यामुळे अनधिकृत व्यवसायांनी डोके वर काढल्याची चर्चा शहरात रंगली आहे.



"पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये असे बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्यावर व लॉटरी , गुटखा व जुगारासारखे अवैध धंदे चालवणाऱ्यावर पोलिसांकडून नियमित कारवाई केली जाते. त्या कारवाई मध्ये वाढ करून या अवैध व्यवसायावर अंकुश ठेवला जाईल

- **श्रीकांत पाठक**, अपर पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तपदी सदानंद दाते असताना हे अनधिकृत व्यसवसाय बंद होते. परंतु त्यांची बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी पदभार स्वीकारला. त्यानंतर काही महिन्यातच पोलीस आयुक्तालय हद्दीत नवनवीन नावाने अनधिकृतपणे ऑनलाईन लॉटरी, गुटखा, जुगार, मटका व शासनाचा महसूल बुडवून विना परवानगी नवनवीन नावाने अनधिकृतपणे ऑनलाईन लॉटरी व व्हिडिओ गेम यांसारख्या बेकायदा धंद्यांचा सुळसुळाट सुरू झाला आहे. मिरा भाईंदर, विरार, नालासोपारा आणि वसई परिसरात अनेक ठिकाणी जुगार अड्डे सुरु झाले आहेत.

मीरा-भाईंदर शहरात नवनवीन लॉटरी सेंटरमध्ये भर पडत आहे. ही लॉटरी सेंटर पूर्वी बंद करण्यात आली होती. आता पुन्हा ही लॉटरी सेंटर सुरू झाल्यामुळे शहरातील तरुण पिढी या वाममार्गाला लागत असल्याचे दिसून येते. शहरात हे लॉटरी सेंटर बिनधास्तपणे सुरू असताना याकडे पोलीस विभागाकडून कानाडोळा केला जात असल्याचे सांगितले जाते. लॉटरी विक्रेत्याकडून असे सांगितले जाते की आम्ही प्रोटेक्शन टॅक्स देतो त्यामुळे कारवाई होत नाही. जे प्रोटेक्शन टॅक्स देत नाहीत त्यांची काही खबरी पोलिसांकडे तक्रार करतात त्यांच्यावर कारवाई होते. किंवा खबऱ्याद्वारे त्याच्यावर हल्ला केला जातो व सामानाची तोडफोड केली जाते. अशीच घटना नवघर पोलीस ठाणे हद्दीत दोन दिवसांपूर्वी घडली असून त्याची तक्रार करण्यात आलेली नाही. कारण अनधिकृत व्यवसाय असल्यामुळे त्याची तक्रार करण्यास घाबरतात किंवा तक्रार करण्यास गेल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल होण्याची भीती असते त्यामुळे तक्रार करण्यास पुढे कोणी येत नाही. या लॉटरी सेंटरमुळे मीरा-भाईंदर शहरात तर शालेय विद्यार्थ्यांनाही मटका व लॉटरीचा छंद लागून ते वाम मार्गावर जाण्याच्या घटना घडत असल्याचे सांगितले जाते. तसेच शहरात अनेक ठिकाणी डान्स बार हे पहाटे उशिरापर्यंत सुरू असल्याचे देखील काही नागरिकांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे पुन्हा बार संस्कृती फोफावते की काय असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. शहरातील काशिमिरा, मीरा रोड, भाईंदर परिसरात गुटखामाफिया हे परराज्यातून गुटखा आणून मोठ्या प्रमाणात विक्री करत आहेत. या सर्व अनैतिक व अनधिकृत चालणाऱ्या व्यवसायांवर पोलीस आयुक्तांनी कारवाई करून नियंत्रण ठेवावे व नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, अशी मागणी संस्थांकडून केली जात आहे.

पुण्यनगरी पु. पान क्र.4

# 'त्या' मृतांच्या नातेवाईकांनाही मदत करा

## डॉ. आंबेडकर जयंती मिरवणुकीतील घटना, आ. हितेंद्र ठाकूर यांची मुख्यमंत्र्यांना विनंती

**नालासोपारा :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विरारमध्ये निघालेल्या मिरवणुकीत विजेचा धक्का लागून दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. यात काहीजण जखमी झाले होते. 'या' मृतांच्या नातेवाईकांना आणि जखमींना सरकारी मदत मिळावी, अशी मागणी करणारे विनंतीपत्र बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष तथा आमदार हितेंद्र ठाकूर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिले आहे. खारघर येथील उष्माघाताच्या बळींना ज्या पद्धतीने सरकारने मदत दिली, त्याच अनुषंगाने या दुर्घटनेतील पीडितांचाही विचार मानवतेच्या दृष्टिकोनातून व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरात ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विविध ठिकाणी तरुणांनी उत्स्फूर्त मिरवणुका काढल्या. डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला विरार पूर्व परिसरातील नागरिकांनी मिरवणूक आयोजित केली होती. मात्र मिरवणुकीला गालबोट लागले. मिरवणूक ऐन भरात असताना विजेचा धक्का लागून रूपेश सुर्वे आणि सुमित सूद यांचा मृत्यू झाला, तर इतर काहीजण जखमी झाले. जखमींवर रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.



या घटनेनंतर काहीच दिवसांत खारघर येथे ज्येष्ठ निरुपणकार पद्मश्री डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यासाठी आयोजित कार्यक्रमाला उपस्थित श्रीसदस्यांपैकी काहींचा उष्माघाताने मृत्यू झाला. अनेकजण उष्माघाताने त्रस्त होऊन रुग्णालयात दाखल झाले. त्या मृतांच्या नातेवाईकांना आणि जखमींना राज्य सरकारने मुख्यमंत्री निधीतून तातडीने मदत जाहीर केली. याबाबत पत्र लिहून आ. हितेंद्र ठाकूर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संवेदनशीलतेबद्दल त्यांचे आभार मानले. याच संवेदनेने विरार येथील मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना मदत करावी, अशी विनंतीही आ. ठाकूर यांनी केली आहे. बहुजन विकास आघाडीने या मृतांच्या नातेवाईकांना आधार देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. जखमींवर व्यवस्थित उपचार होतील, याचीही आम्ही काळजी घेतली आहे. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त निघालेल्या मिरवणुकीत हा प्रकार घडला, ही दुःखद बाब आहे. मुख्यमंत्र्यांनी या घटनेची दखल घेऊन तातडीची मदत जाहीर करावी, अशी अपेक्षा आ. हितेंद्र ठाकूर यांनी व्यक्त केली.

CamScanner

लोकसत्ता पु. पान क्र.1

दि. 21/04/2023

# पाण्याविना विरारमधील म्हाडावासीयांचे हाल

## यंदाचा उन्हाळाही कोरडाच

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसईः** विरारच्या म्हाडा संकुल परिसरातील नागरिकांना मुबलक पाणी मिळत नसल्याने नागरिकांचे पाण्याविना हाल होऊ लागले आहेत. वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण न झाल्याने पाणी इतक्यात देणे शक्य नसल्याचे पालिकेने स्पष्ट केल्याने म्हाडावासीयांचा यंदाचा उन्हाळा कोरडाच जाणार आहे.

विरार पश्चिमेतील बोळिंज येथे म्हाडा वसाहत उभारण्यात आली आहे. या ठिकाणी मोठ्या संख्येने नागरिक राहत आहेत. मात्र मागील पाच ते सहा वर्षांपासून या भागातील नागरिकांना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. बुधवारी खासदार राजेंद्र गावित यांच्या उपस्थितीत अधिकारी व म्हाडा रहिवासी यांच्यात बैठक पार पडली. यावेळी पाणी प्रश्न सुटला नसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला. संकुलात सध्या स्थितीत प्रतिदिन १० लाख लिटर पाण्याची गरज आहे. परंतु केवळ तीन लाख लिटर पाणीच मिळत आहे. २२०० सदनिकाधारकांना याचा ताबा देण्यात आला असून त्या मानाने पाणी खूपच अपुरे आहे. ५५ ते ६० टँकरद्वारे पारोळ येथून पाणीपुरवठा केला जात आहे. ते पाणीही अशुद्ध असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

सध्या पालिकेकडे असलेले पाणी अपुरे असल्याने पाण्याचे वितरण करण्यात अडचणी येत असल्याचे पालिकेने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आणखीन काही महिने म्हाडावासीयांचे पाण्याविना हाल होणार आहेत.

### एमएमआरडीएचे पाणी आल्यानंतर पाणी प्रश्न सुटणार

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) हाती घेण्यात आलेल्या सूर्या प्रादेशिक प्रकल्प ४०३ दशलक्ष लिटर्स पाण्याची योजना आहे. त्यातील वसई विरार शहराला जवळपास १८५ दशलक्ष लिटर इतके पाणी उपलब्ध होणार आहे. हे पाणी शहरात आणण्यासाठी पालिकेने प्रयत्न सुरू केले आहेत. जेव्हा हे पाणी उपलब्ध होईल तेव्हाच म्हाडा संकुलातील पाण्याचा प्रश्न सुटणार आहे, असे पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी स्पष्ट केले आहे.

### जलकुंभ उभारण्याची मागणी

पाण्याचे वितरणासाठी म्हाडा परिसरात जलकुंभ उभारण्याची मागणी आहे. अमृत २ योजनेतून जलकुंभ प्रस्तावित आहे. जागा उपलब्ध झाल्यास त्या ठिकाणी जलकुंभ उभारू अशी माहिती पाणीपुरवठा विभागाने दिली आहे.

# वर्सोवा-विरार सागरी सेतू प्रकल्पासाठी भू-तांत्रिक अभ्यास

## सल्लागाराची नियुक्ती करणार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) वर्सोवा-विरार सागरी सेतू प्रकल्पाचा भू-तांत्रिक अभ्यास करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात येणार असून सल्लागाराच्या नियुक्तीसाठी नुकतीच निविदा जारी करण्यात आली आहे.

वर्सोवा-विरार अंतर कमी करण्यासाठी, तसेच प्रवास ४० ते ४५ मिनिटांत करता यावा आणि पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी दूर व्हावी यासाठी महामंडळाने वर्सोवा-विरार सागरी सेतू बांधण्याचा निर्णय घेतला. मात्र आर्थिक कारणामुळे हा प्रकल्प मार्गी लागला नाही. एमएमआरडीएने हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. प्राधिकरणाच्या मार्चमधील बैठकीत या प्रकल्पाचा विस्तार पालघरपर्यंत करण्यास हिरवा कंदील दिला. आता एमएमआरडीएने भू-तांत्रिक अभ्यास करण्यासाठी निविदा जारी केल्या आहेत.

### दीड वर्षाचा कालावधी

भू-तांत्रिक अभ्यासानुसार प्रकल्पाचा सविस्तर आराखडा तयार केला जातो. वर्सोवा-विरारदरम्यान समुद्राखाली किती दगड आणि माती आहे, किती खोल पाया करावा लागेल, अशा अनेक बाबींचा अभ्यासात समावेश आहे, अशी माहिती एमएमआरडीएतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. अभ्यास पूर्ण झाल्यानंतर आराखडा तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे काम प्रत्यक्षात सुरू होण्यासाठी आणखी एक ते दीड वर्ष लागण्याची शक्यता आहे.

CamScanner

दि. 21/04/2023

लोकमत मध्यमुंबई पान

लोकमत पु. पान क्र.५

# मौजमजेसाठी २७ लाखांची चोरी

## एकास अटक, तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांची कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मौजमजेसाठी सोन्याच्या दुकानातून २७ लाखांच्या ऐवजाची चोरी करणाऱ्या आरोपीला तुळींजच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी बुधवारी अटक केली.

तुळींज रोड येथील गंगोत्री गोकुळ टॉवर येथे राहणाऱ्या लक्ष्मीलाल जैन (४९) यांची आरोपी महावीर उर्फ सनी जैन यांनी ३ मे २०२२ ते ६ मार्च २०२३ दरम्यान होलसेल सोने विक्रीच्या भागीदारीत व्यवसाय करू, असे सांगत ३ किलो ४०० ग्रॅम वजनाचे सोने असा १ कोटी ८० लाख रुपयांची सोन्याची बिस्किटे घेतली होती. तसेच त्यांचा भाऊ नेमीचंद जैन, राजेश जैन व नितीन जैन यांच्याकडून ३० लाख रुपये आरटीजीएसने ऑनलाइन घेतले होते. भागीदारीत केशरीमल जैन यांचा मुलगा हितेश याला सोबत न घेता एकूण २ कोटी १० लाख रुपयांची त्यांची फसवणूक केल्याप्रकरणी १८ मार्चला तुळींज पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर हा आरोपी फरार झाला होता. त्यानंतर आरोपी महावीर जैन याचा जामीन अर्ज वसई न्यायालयाने फेटाळला होता. तुळींज पोलिसांनी बुधवारी संध्याकाळी वसई न्यायालयाच्या बाहेरून आरोपीला अटक केली आहे.

पोलिसांनी आरोपीला वसई न्यायालयात हजर केल्यावर पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलिसांनी आरोपीकडे केलेल्या तपासादरम्यान त्याने तीन किलो सोने नव्हे तर २७ लाखांचा ऐवज लंपास करून सर्व पैसे मौजमजेसाठी खर्च केल्याचे निष्पन्न झाले आहे.



# मीरा-भाईंदर महापालिकेला द्वितीय पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** राज्य शासनाच्या नगरविकास दिनानिमित्त ८९ टक्के इतका मालमत्ता कर वसूल केल्याबद्दल मीरा-भाईंदर महापालिकेस द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते देण्यात आला.

पालिकेने १८१ कोटी ५२ लाख ९३ हजार रुपये इतका मालमत्ता कर एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या आर्थिक वर्षात केला आहे. नगरविकास दिनानिमित्त गुरुवारी महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ८९ टक्के कर वसुलीसाठी द्वितीय पुरस्कार देऊन कौतुक करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, आदी उपस्थित होते.

विक्रमी मालमत्ता कर वसुली आणि उत्पन्न वाढीबरोबरच आस्थापना खर्चात बचत केल्यामुळे हा पुरस्कार देण्यात आल्याचे पालिकेचे जनसंपर्क अधिकारी राज घरत यांनी माहिती देताना सांगितले. सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कर वसुलीसाठी केलेल्या प्रयत्नाने हा पुरस्कार प्राप्त झाल्याचे सांगत आयुक्त यांनी सर्वांचे अभिनंदन करून आभार मानले आहेत.

CS CamScanner

1997 से

KAT खबरें आज तक

not a publication of the living media india group

वर्ष: 26 अंक-306 मुंबई, शुक्रवार 21 अप्रैल 2023 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# फायनेंस कंपनी व ग्राहकों से ठगी में तीन गिरफ्तार



**वसई :** नालासोपारा पुलिस स्टेशन की क्राइम डिटेक्शन सेल की टीम को एक बड़ी सफलता मिली है।दरअसल,पुलिस ने फायनेंस कंपनियों व ग्राहकों से ठगी कर दोपहिया वाहन बेचने वाले आरोपियों को गिरफ्तार कर 17 दोपहिया वाहन जब्त किया है,जिसकी कुल कीमत 10 लाख से अधिक बताई गयी है।

यह कार्रवाई डीसीपी (परिमंडल 3 ) सुहास बावचे व एसीपी चंद्रकांत जाधव के मार्गदर्शन में नालासोपारा पुलिस स्टेशन के सीनियर पी.आई विलास सुपे,पी.आई (क्राइम ) राहुल सोनावणे,सपोनि.पंडीत मस्के व सपोनि.अमोल तलेकर की टीम ने की है।

यह जानकारी पुलिस अधिकारी ने गुरुवार को दी है।पुलिस के मुताबिक,14 अप्रैल को शिकायतकर्ता संकेत विष्णु मोहिते उम्र 25 वर्ष,निवासी- नालासोपारा ने नालासोपारा थाने में आकर शिकायत दिया कि 22 दिसंबर को शिकायतकर्ता अपने एक्टिवा मोटर स्कूटर से घर जा रहा था,इस बीच आरोपी नाम पॉल नाडर ने कारण बताया कि शिकायतकर्ता के मोटर स्कूटर की कर्ज की किस्तें बकाया हैं,शिकायतकर्ता के स्कूटर को वित्त कंपनी एल एंड टी के पास जमा किया जाना है,ऐसा कहकर उक्त स्कूटर वालों के स्कूटरों का गबन कर उन्हें कंपनी में जमा कराए बिना एक-दूसरे को बेचकर ठगी की गई है।

पुलिस ने कलम 420,406,34 के तहत एफआईआर दर्ज कर आगे की जांच में जूट गई। अपराध में आरोपी (1).पॉल मुर्गन अनबल्लगन नाडर,(2).सलमान हनीफ शेख व (3).सुधांशु ममुराली कनोजिया को नालासोपारा पुलिस ने 16 अप्रैल को गिरफ्तार किया।

पुलिस के अनुसार, गिरफ्तार आरोपी से आगे की पूछताछ पर उसने उक्त अपराध को अंजाम देने की बात कबूल कर ली है। 10,90,000/- रुपये मूल्य की कुल 17 मोटरसाइकिलें और स्कूटर जब्त किए गए और टू-व्हीलर फाइनेंस कंपनी में बिना डिपॉजिट के बेचे गए, उन्होंने इसी तरह कई ग्राहकों को ठगा।

CS CamScanner

पुढारी

# पेईंग गेस्ट बुकिंगच्या नावाने फसवणूक

## राजस्थानच्या भामट्याला मुंबई पोलिसांनी ठोकल्या बेड्या

**ठाणे : पुढारी डेस्क**

कोलकात्ता येथे पेईंग गेस्ट म्हणून रूम बुक करणे एका महिलेच्या अंगलट आले. रजिस्ट्रेशनच्या नावाने महिलेची ८१ हजार ६९४ रुपयांची फसवणूक करणाऱ्या राजस्थानच्या आरोपीला मुंबई पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आतारसिंग डुंगर सिंग यादव (४०) असे आरोपीचे नाव आहे. या आरोपीला शुक्रवारी न्यायालयात हजर केले जाणार आहे. या आरोपीसह आणखी एका गुन्ह्यातील आरोपीला अटक करण्यात आल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.

मुंबईतील माटुंगा परिसरात राहणारी सरस्वती (बदललेले नाव) ही एका नामांकित ई-कॉमर्स कंपनीत कार्यरत आहे. तिची नुकतीच कोलकात्ता येथे बदली झाली होती. तेथे राहण्यासाठी सरस्वतीने गुगलवर रूम सर्च केले. त्यावेळी निदर्शनास आलेल्या वेबसाईटवरील एका जाहिरातीतल्या मोबाईल क्रमांकवर तिने संपर्क साधला. पेईंग गेस्ट म्हणून राहण्यासाठी तिला रूमचे फोटो पाठवण्यात आले. सदर रूम आवडल्याने सरस्वतीने बुकिंगसाठी २ हजार रुपये त्या इसमाला ऑनलाईन ट्रान्सफर केले. सरस्वती जाळ्यात अडकल्याचे लक्षात येताच भामट्याने पेईंग गेस्ट रजिस्ट्रेशनकरिता ५२ हजार रुपये देण्यास सांगितले. शासकीय नोंदीचा एक भाग समजून तिने ५२ हजार रुपयेही ट्रान्सफर केले. दरम्यान, आणखी पैशांची मागणी करताच तिने पुन्हा हजारो रुपये ट्रान्सफर केले. अशा प्रकारे ८१ हजार ६९४ रुपये पाठवल्यानंतर तिच्याकडे पुन्हा वेगवेगळी कारणे सांगून पैशांची मागणी करण्यात आली. या एकूणच व्यवहारावर तिला संशय आला. अखेर तिने माटुंगा पोलीस ठाणे गाठले. घडलेल्या प्रसंगाची नोंद करून अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.



### ग्रामस्थांचा पोलिसांवर हल्ल्याचा प्रयत्न

कारवाईसाठी मुंबईचे माटुंगा पोलीस राजस्थानमधील भारतपूर येथे आल्याची माहिती ग्रामस्थांना समजली. त्यावेळी ग्रामस्थांनी आरोपीची अटक टाळण्यासाठी मुंबई पोलिसांवर हल्ल्याचा प्रयत्न केला. मात्र तपासी पथकाने प्रसंगावधान राखत आरोपीला ताब्यात घेऊन मुंबई गाठली.

सदर गुन्ह्याचा तपास उपायुक्त प्रवीण मुंढे, एसीपी संजय जगताप, वपोनि दीपक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे प्रकटीकरणचे सपोनि दिगंब पगार, पोउपनि प्रसन्नजीत कदम अंमलदार भोये, संतोष पवार, मंगेश जऱ्हाड, बंजारा आदी पोलिसांचे पथक तपास करू लागले. तांत्रिक माहितीच्या आधारे तपास सुरू असताना आरोपीची माहिती पोलिसांना समजली. त्यानुसार राजस्थानमध्ये जावून तपासी पथकाने आरोपी आतारसिंग याला अटक केली.



CamScanner

# तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : महामार्गावर लाखोंचा तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

सोपारा फाटा ओव्हर ब्रिजखाली बुधवारी दुपारी टेम्पोमध्ये विरार वाहतूक पोलिस कर्मचारी ज्ञानेश्वर घुगे यांना गोण्यांमध्ये भरलेला विविध कंपन्यांचा पानमसाला व टेम्पो असा १६,१७,९२० रुपये किमतीचा तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आढळून आला होता. मोहम्मद अफजल रिजवान अहमद खान याला अटक करण्यात आली असून, सुशील कन्हैयालाल खारवार व जावेद दिलशेर शेख यांच्याविरोधात बुधवारी पेल्हार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

लोकमत

# २१ लाख ४० हजारांच्या ३४ दुचाकी हस्तगत

गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी पॉल मुर्गन अनबल्लगन नाडर, सलमान हनीफ शेख आणि सुधांशू ममुराली कनोजिया यांना १६ एप्रिलला ताब्यात घेतले. आरोपींनी आपसांत संगनमताने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यावर पोलिसांनी अटक केली आहे. अधिक चौकशी केली असता त्यांनी अनेक दुचाकी परस्पर विक्री केल्याचे तपासादरम्यान निष्पन्न झाले. आरोपींनी परस्पर अपहार व विक्री केलेल्या २१ लाख ४० हजार रुपये किमतीच्या ३४ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत.

Hello Vasai
Page No. 2 Apr 21, 2023
Powered by: erelego.com

CamScanner

लोकमत

# ताई, तू फक्त हिंमत कर; पोलिस ठाण्यात सखी डेस्क मदतीला!

## स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळण्यासाठी 'महिला मदत कक्ष'

**मंगेश कराळे**

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सन्मानाची वागणूक मिळावी, यासाठी वसई आणि विरार या दोन परिमंडळात अकरा पोलिस ठाण्यांत महिला साहाय्यता कक्ष उभारण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, विविध पोलिस ठाण्यात पाहणी केली असता प्रत्यक्षात महिला साहाय्यता कक्षच दिसले नाहीत.

वसईतील पोलिसांच्या दप्तरी नोंद होणाऱ्या महिला अत्याचाराच्या चढ्या आलेखामुळे घराबाहेर पडलेली मुलगी सुरक्षित किती? असा प्रश्न कुटुंबीयांना पडत आहे. हीच भीती लक्षात घेत वसईतील निर्जन स्थळ, अंधाऱ्या वाटा आणि रोडरोमिओ पोलिसांच्या रडारवर आले आहेत. ओळखीचे व नातेवाईकही अशा पीडित मुली, तरुणी आणि महिलांना वेगवेगळे आमिष दाखवून त्यांच्यासोबत अत्याचार करतात, असेही दिसून आले आहे.




### प्रत्येक ठाण्यात 'महिला साहाय्यता कक्ष'

पोलिस ठाण्यात येणाऱ्या महिलांना तत्काळ मदत मिळावी व त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जावे, म्हणून तत्कालीन पोलिस आयुक्त सदानंद दाते यांनी प्रत्येक पोलिस ठाण्यात महिला साहाय्यता कक्ष उभारण्यात आल्याचे नमूद केले होते. येणाऱ्या प्रत्येक महिलेचे म्हणणे ऐकून घेऊन तिला तत्काळ मदत केली जात असल्याचे माहिती पुस्तिकेत म्हटले होते, तर प्रत्यक्षात असे केंद्र मात्र दिसले नाही.

### 'लोकमत'ने काय पाहिले?

- **महिला साहाय्यता कक्ष नसल्याने येणाऱ्या महिलांना पुरुष ठाणे अंमलदार वा पुरुष अधिकारी यांना भेटून अडचण सांगावी लागते. त्यातही तक्रारीसाठी येणाऱ्या महिलांना त्यांचे म्हणणे समजून न घेता तात्कळत थांबवले जाते.**
- तक्रार अर्ज घेण्यास अनेक वेळा टोलवाटोलवी केली जाते. मात्र, काही महिलांची पोलिसांनी विचारपूस करून त्यांची तक्रार घेऊन त्यांना मार्गदर्शन होत असल्याचेही किस्से आहेत.

### तीन परिमंडळांत तीन महिला पथके

पोलिस आयुक्तालयाच्या तीन परिमंडळात महिलांच्या मदतीसाठी पोलिस उपायुक्तांच्या मार्गदर्शनाखाली तीन महिला पथके आहेत. या पथकांमध्ये एक महिला अधिकारी व अन्य ३ पोलिस कर्मचारी कार्यरत आहेत.

### दामिनी पथकाची स्थापना व्हावी

छेडछाडीला आळा बसावा, यासाठी पोलिस आयुक्तालयात दामिनी पथकाची स्थापना करण्याची मागणी होत आहे. आयुक्तालयात अद्यापपर्यंत दामिनी पथक नाही. रोडरोमिओंच्या बंदोबस्तासाठी दामिनी पथके स्थापन करण्याची मागणी होत आहे.

### पोलिस ठाण्यांत महिला अधिकारी नियुक्त

पोलिस ठाण्यात महिला अधिकारी नियुक्त असून त्यांच्या स्तरावर महिला साहाय्यता कक्ष सुरु आहे. वसईत भरोसा सेल महिलांसाठी कार्यरत आहे.

\- विशाल धायगुडे, जनसंपर्क अधिकारी



CamScanner

लोकमत



नालासोपारा गुन्हे शाखा युनिट-२ च्या पथकाने फायनान्स कंपनी व ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या आरोपींवर कारवाई करीत दुचाकी जप्त केल्या आहेत.

Hello Vasai
Page No. 2 Apr 21, 2023
Powered by: erelego.com

CamScanner